## नियमती फौजदारी खटला क्रं. ५१/२०२१ नि. १० खालील आदेश.

०१. सदरचा अर्ज यातील मुळ फिर्यादी यांनी आरोपी विरुध्द ३२६ हे कलम वाढविणेतय यावे म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणात दोषारोप नोंदवणे बाकी आहे.

०२. फिर्यादीने त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, सदरकामी आरोपींनी फिर्यादीला दि.३१–०३–२०२१ रोजी मारहाण केलेबाबत फिर्याद दि. ३१–०३–२०२१ रोजी शाहुवाडी पोलीस ठाणे येथे दाखल केली आहे. फिर्यादी हे येळवडी, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथील रहिवाशी आहेत. आरोपींनी फिर्यादीला डोक्यात उजवे बाजूस टॉमीने मारहान केली होती. त्यानंतर फिर्यादीच्या वडीलांनी त्यांना उपचाराकरीता दवाखान्यात दाखल केले. सदर जखमा या गंभीर स्वरुपाच्या असल्यामुळे फिर्यादीचे डोकीत टाके घातले आहेत. असे असताना पोलीसांनी कलम ३२६ लावणे गरजेचे होते. परंतु आरोपींचे राजकीय वर्चस्व जास्त असलेने राजकीय दबावातुन ३२६ कलम लावले नाही. त्यामुळे सदरचा गुन्हा गुणदोषावर चालुन निर्णय होणे आवश्यक आहे तरी सदर कामात ३२६ कलम लावणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत

गरजेचे आहे. त्यासाठी फिर्यादीने अर्जासोबत फोटो दाखल केले आहेत. त्यामुळे फिर्यादीने सदर कलम वाढविणेत यावे अशी विनंती केली आहे.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जावर दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदर कामी तपासधिकारी यांनी तपास करुन कागदपत्रे हजर केली आहेत. यातील फिर्यादी हे गंभीर स्थितीत जखमी होते.

०४. आरोपीतर्फे त्यांचे म्हणण्यात असे कथन केले आहे की, फिर्यादीने दिलेला अर्ज हा पुर्णपणे चुकीचा व कायदयातील तरदतुदींचे विरुध्द असलेने तो चालणेस पात्र नाही. सदर कामी तपासीधिकारी यांनी दाखल केलेले वैद्यकीय प्रमाणपत्राचे अवलोकन केले असात त्यामध्ये "Simple Injury" असे स्पष्टपणे नमुद केले आहे. तसेच मुळ फिर्यादीतर्फे भा.द.वि.स. ३२६ चे अनुषंगाने कोणताही वैद्यकीय पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती आरोपीतर्फे करणेत आली आहे.

०५. दोन्ही बाजुंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथने, म्हणणे व अभिलेखावर दाखल केलेले दस्तांचे अवलोकन केले. सदरकामी तपासधिकारी यांनी जखमी/फिर्यादी अक्षय याचे दाखल केलेले वैद्यकीय प्रमाणपत्राचे अवलोकन करता असे आढळून येते की, सदर जखमी/फिर्यादी

अक्षय यास साध्या स्वरुपाची जखम (Simple injury) झाल्याचे वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय,मलकापूर यांनी दर्शविले आहे. तसेच फिर्यादी यांनी सदर अर्जाच्या कथनापृष्ठयर्थ भारतीय दंड विधान संहिता कलम ३२६ लावणे करीता कोणताही जादाचा वैद्यकीय पुरावा दाखल केलेला नाही. दाखल फोटोवरुन तथाकथित जखम गंभीर आहे असा अंदाज लावता येणे चुकीचे ठरेल. प्रथमदर्शनी भा.द.वि.स कलम ३२४,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ चे घटक समोर येत आहेत. त्यामुळे फिर्यादीची ही विनंती मान्य करता येणार नाही. सबब, मी पुढील आदेश करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. आरोपी विरुध्द भा.द.वि.स कलम ३२४,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात यावा.

Neha K.Nagargoje
Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2023.04.12 17:07:54 +0530

(नेहा कों.नागरगोजे)
न्यायदंडाधिकारी प्रथवर्ग,
कळे–खेरीवडे.

कळे–खेरीवडे.
दि. ११.०४.२०२३.